नियमित दिवाणी दावा क्र. ९७/२०२२
माणिक पप्पलवाड वि. सखाराम सुरनर

MHND190003922022

## निशाणी क्रमांक ३० वरील आदेश

( दिनांक २७/०७/२०२४ )

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने निशाणी क्र. ३० वर दिनांक ०४/०५/२०२४ रोजी दाखल केला. निशाणी क्र. २७ वरील आदेश हा दिनांक १३/०३/२०२४ रोजी पारीत झाला असुन आदेशातील दुरूस्ती साठी ३६ दिवसाचे वर वेळ झाल्याकारणाने वादीचे खाजगी अडचणीमुळे त्यांना दाव्यामध्ये दुरूस्ती करण्यासाठी विलंब झाला याबददल अर्ज दाखल करण्यात आला. प्रतिवादीने सदर अर्जाला जाणीव बुजून विलंब केल्याचे म्हणणे सादर करुन अर्ज खर्चासह मंजुर करावा याबददल म्हणणे दाखल केले.

२. वादीचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे, दोन्ही पक्षाचे युक्तीवाद व अभिलेखावर सादर दस्तऐवजांचे काळजीपुर्वक अवलोकन केले.

३. वादीने अर्ज आपल्या मुळ दाव्याच्या चर्तु:सिमेमध्ये दुरूस्ती करुन मुळ दावामध्ये समाविष्ठ करण्यासाठी सादर केला होता. सदरील अर्जातील विनंती लक्षात घेता व सदर दुरुस्ती ही दोन्ही पक्षकारांमधील वादाचा खरा मुद्दा निश्चित करुन न्यायनिर्णय करण्याकरीता गरजेचे असल्यास सदर दुरुस्ती ही मंजूर केली होती. परंतु वादीने सदरची दुरूस्ती विहीत वेळेत केली नाही. परंतु वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज नामंजुर केल्यास वादीवर अन्याय होईल व न्यायालयास गुणदोषाच्या आधारे न्यायनिर्णय देण्यास अडचण निर्माण होईल. तेव्हा सदरील अर्ज मंजुर करणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर करुन त्यांनी मागितलेली प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी देणे योग्य व न्यायाचे होईल. करीता पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१) वादीचा निशाणी ३० वरील अर्ज रुपये ३००/- खर्च प्रतिवादी यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२) वादी यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी वादपत्रामध्ये १४ दिवसांचे आत करुन दुरुस्ती करुन सुधारीत वादपत्र सादर करावे.

स्वाक्षरीत/-
( श्रीमती पी. व्ही चिद्रे )
२रे सह दिवाणी न्यायाधीश
लोहा.

ठिकाण : लोहा
दिनांक : २४/०७/२०२४